सर्वोत्तम संस्थेसाठी कॅनडा येथील कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने सन्मानित

ज्ञानगंगा घरोघरी

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक-422222

Ph. :0253-2231479, http://ycmou.digitaluniversity.ac e-mail : coe@ycmou.digitaluniversity.ac

परीक्षा विभाग

जा.क्र. : exam2/MBA/CA/Notification/025/990 दिनांक : 19.12.2023

नोटिफिकेशन - ०१

अभ्यासकेंद्र आणि संमंत्रक (गृहपाठ तपासनीस) यांच्यासाठी महत्वाच्या सूचना

ऑनलाईन गृहपाठ (Home Assignment)

एम.बी.ए. (P79) शिक्षणक्रम

प्रथम वर्ष - प्रथम सत्र

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे आपण **एम.बी.ए. (P79) शिक्षणक्रमाचे** विद्यार्थी आहात. आपला प्रवेश कायम झाला असल्याने आपले अभिनंदन!

शैक्षणिक सत्र 2023-2024 पासून एम.बी.ए. (P79) प्रथम वर्षाच्या प्रथम सत्रासाठी नियमित प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी हस्तलिखित गृहपाठ (Home Assignment) हे **ऑनलाईन पद्धतीने विद्यापीठाच्या पोर्टलवर अपलोड** करणे बंधनकारक आहे.

1. विद्यार्थ्यांनी https://ycmou.digitaluniversity.ac या विद्यापीठाच्या पोर्टलवर home assignment या टॅबवर शिक्षणक्रमनिहाय गृहपाठ (home assignment – questions) विद्यापीठाकडून प्रश्न अपलोड केलेले आहेत. या अपलोड गृहपाठ – प्रश्नाचे प्रिंट काढून घ्यावेत. त्याचप्रमामणे सोबत गृहपाठ लिहिण्यासाठी विद्यापीठाने तयार करण्यात आलेला 2 पानांचा नमुना देखील प्रिंट काढून घ्यावा.
2. गृहपाठ लिहिण्यासाठी विद्यापीठाने तयार करण्यात आलेला दोन पानांचा नमुना प्रिंट काढून घेतल्यानंतर पहिल्या पानावरील माहिती अचूक भरणे आवश्यक आहे. तसेच पान क्रमांक 02च्या, विद्यार्थ्याला आवश्यक असतील इतक्या पानांच्या झेरॉक्स प्रती तयार करून प्रत्येक पानावर पान क्रमांक, कायम नोंदणी क्रमांक, अभ्यासक्रम सांकेतांक (course code), अभ्यासकेंद्र सांकेतांक (centre code) आणि विद्यार्थी स्वाक्षरी आवश्यक आहे. त्यानुसार विषयनिहाय/अभ्यासक्रमनिहाय गृहपाठ पूर्णपणे लिहून तयार करून ठेवायचे आहेत. विद्यार्थ्यांनी लिहून तयार केलेले गृहपाठ अभ्यासकेंद्राकडे जमा न करता विद्यापीठाच्या पोर्टलवर पी डी एफ (PDF) स्वरूपात दिनांक 06-01-2024 पर्यंत अपलोड करावयाचे आहेत.
3. ऑनलाईन गृहपाठ अपलोड करण्यासाठी https://asm.ycmou.org.in या संकेत स्थळाला भेट द्या.
4. गृहपाठाची तयार करण्यात आलेली पी डी एफ ही चांगल्या प्रतीची, सुस्पष्ट व वाचता येण्याजोगी असावी. प्रत्येक पानाची साईज किमान 3 एम बी आणि सर्व पाने मिळून जास्तीत जास्त 20 एम बी पेक्षा अधिकची नसावी.
5. विद्यार्थ्याने प्रश्न सोडवितांना शक्यतो एका क्रमाने व एका पानावर एका गृहपाठाचे उत्तर येईल या बेताने लिखाण करावे, तसेच एका पानात पुरेसे लिखाण बसत नसल्यास पुढील पानावर प्रश्न क्रमांक (उदा. Q-1 Continued....) टाकून लिहावे.
6. विद्यार्थ्याने प्रश्नाचे उत्तर लिहितांना प्रत्येक प्रश्नासाठी किमान 50 ते 60 शब्दांमध्ये उत्तर लिहिणे अपेक्षित आहे. प्रत्येक प्रश्न स्वतंत्र पानावर लिहावा. सर्व गृहपाठ कमीत कमी शब्दांत व मुद्देसूद असावेत व 4 ते 5 पानांमध्ये पूर्ण होणे अपेक्षित आहे.

7. विद्यापीठाकडून तयार करण्यात आलेल्या पोर्टलवरील लिंकवर https://asm.ycmou.org.in अभ्यासक्रमनिहाय विद्यार्थ्यांनी संबंधित गृहपाठ विषय/अभ्यासक्रम निहाय फाईल (file) तयार करून अपलोड करावयाची आहे .
8. विद्यापीठ पोर्टलवर आपणास गृहपाठ अपलोड करण्यासाठी नोंदणी करावी लागेल. नोंदणी करण्यासाठी पोर्टलवर उपलब्ध Student User Guide सविस्तर वाचावे. त्यासाठी विहित कालावधीतच याची पूर्तता करावयाची आहे. विहित कालावधीनंतर गृहपाठ अपलोड करण्याची सुविधा आपणांस विद्यापीठाकडून उपलब्ध होणार नाही, याची नोंद घ्यावी.
9. आपल्या शिक्षणक्रमातील अभ्यासक्रम निहाय गृहपाठ स्वतंत्रपणे पोर्टलवर आपल्या लॉग ईन मध्ये अपलोड करावयाचे आहेत. त्यासाठी पोर्टलवर व्यवस्था केलेली आहे.
10. विद्यार्थ्यांचा गृहपाठ अपलोड झाल्यानंतर मुख्यालयाकडून त्याचे मूल्यमापन केले जाईल. गृहपाठ तपासणीमध्ये पात्र (Approved) झाल्यास त्याचे गुणदान होईल. मात्र आपण अपलोड केलेली गृहपाठाची पाने जर अवाचनीय असतील व लिहिलेले उत्तर असमाधानकारक असेल तर त्याचे मूल्यमापन होणार नाही. ते अपात्र (Reject) केले जाईल, याची नोंद घ्यावी.
11. अपात्र (Reject) झालेले गृहपाठ विद्यार्थ्यांच्या लॉग-ईनला पुन्हा रिसबमिशनसाठी उपलब्ध होतील. रिसबमिशनदेखील विहित कालावधीतच करावे लागेल. अन्यथा गृहपाठ तपासला जाणार नाही व त्याचे गुणदान होणार नाही. त्यामुळे आपल्या गुणपत्रिकेतील अंतर्गत गुण (CA) रकाना Absent (Ab) दिसेल याची नोंद घ्यावी.
12. विद्यार्थ्यांनी आपले लॉग-ईन सातत्याने पाहात राहावे, तसेच विभागीय केंद्र व मुख्यालयाशी संपर्कात राहाणे अपेक्षित आहे.

तांत्रिक अडचण उद्भवल्यास अथवा इतर तत्सम अधिक माहितीसाठी विद्यापीठाने तयार केलेल्या सॉफ्टवेअर कंपनीच्या प्रतिनिधींशी 8055253072 या भ्रमणध्वनीवर संपर्क करू शकता. अथवा oasishelpdesk22@gmail.com या ईमेलवर आपल्या शंका विचारू शकता.

वरील सर्व सूचनांचे काटेकोर पालन करून आपले गृहपाठ (Home Assignment) पूर्ण करण्यासाठी आपणास शुभेच्छा!

भटूप्रसाद पाटील
परीक्षा नियंत्रक

सोबत — (१) गृहपाठ उत्तरपुस्तिका नमुना — 2 पाने.

प्रत माहिती व उचित कार्यवाहीसाठी —

(१) **सर्व विभागीय केंद्रे — अमरावती/औरंगाबाद/मुंबई/नागपूर/नाशिक/पुणे/कोल्हापूर/नांदेड**
(आपल्याला विभागीय केंद्रांतर्गत असलेल्या सर्व एम बी ए (P79) प्रथम वर्षाच्या, प्रथम सत्र 2023-24 च्या अभ्यासकेंद्रामार्फत प्रवेशार्थी विद्यार्थ्यांपर्यंत वरीलप्रमाणे सूचनापत्रक पाठवून ऑनलाईन गृहपाठ पद्धतीबाबत अवगत करावे.)

टीप — वरील सूचनापत्रकातील सर्व माहिती अभ्यासकेंद्र, विभागीय केंद्र यांनी विद्यार्थ्यांच्या वेळोवेळी निदर्शनास आणून द्यावी. याबाबत स्वतंत्रपणे विद्यार्थ्यांना कळविले जाणार नाही.

YASHWANTRAO CHAVAN MAHARASHTRTA OPEN UNIVRSITY, NASHIK

(Estd. By Government of Maharashtra)
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan, Nashik-422 222

Home Assignment

Academic Year - 20..... - 20.....

Name of the Programme & Prog. code	
Year/Semester	
Name of the course & course code	
Name of the student	
Permanent Registration Number	
Student Address	
Mobile Number	E-mail ID -
Name of the Study Centre & code	
Date of submission	No. Of pages Attached :

Start writing Home Assignment form the next line. Write page number on each page.
This format is developed by YCMOU and it should not be misused. Student signature should be on each page.

Q. No	

Student Signature -

YASHWANTRAO CHAVAN MAHARASHTRTA OPEN UNIVRSITY, NASHIK

PRN -	Course code -	Study Centre code -

Q. No	

Student signature -